वर्ष-०९ | अंक-०१ | मुंबई, मंगळवार २२ ते २८ नोव्हेंबर - २०२२ | पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

PG 2

# पोलीस बातमी पत्र

पोलीस बातमी पत्र

POSTAL REGISTRATION No.PLG/205/2022-2024

• संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

सामना हवामान बदलाचा

3 → घरोघरीच्या जेवणाशी भिडणारं आंतरराष्ट्रीय राजकारण

बँकेच्या ग्राहक सेवा केंद्राला दूरध्वनी करणे पडले महागात;महिलेच्या बँक खात्यातून साडेअकरा लाख रुपये गायब ← 4

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

## महरौलीच्या जंगलात सापडले श्रद्धाच्या मृतदेहाचे दोन तुकडे, फॉरेंसिक अहवालाची प्रतिक्षा



दिल्लीतील श्रद्धा वालकर हत्या प्रकरणामुळे सर्व देश हादरून गेला आहे. आरोपी आफताबने त्याची गर्लफ्रेंड श्रद्धा वालकरचा खून करून त्याची विल्हेवाट लावण्यासाठी तिच्या मृतदेहाचे 35 तुकडे केले. श्रद्धा वालकर हत्या प्रकरणात पोलिसांकडून कसून तपास सुरु आहे. हत्येला सहा महिने उलटून गेल्यामुळे पोलिसांसमोर पुरावे गोळा करण्याचं मोठं आव्हान आहे. या प्रकरणात आता पोलिसांना श्रद्धाच्या मृतदेहाचे आणखी दोन तुकडे सापडले आहेत. दिल्लीतील महरौलीच्या जंगलात पोलिसांना श्रद्धाच्या मृतदेहाचे दोन तुकडे सापडले असून ते आता फॉरेन्सिक चाचणीसाठी पाठवण्यात आले आहेत. दिल्ली पोलिसांनी याआधी आफताबच्या फ्लॅटमधून आरोपी आफताब अमीन पूनावाला आणि श्रद्धा वालकर यांचे कपडे जप्त केले आहेत आणि ते फॉरेन्सिक तपासणीसाठी पाठवले आहेत. श्रद्धाच्या मृतदेहाचे दोन तुकडे सापडले दिल्ली पोलीस श्रद्धाच्या मृतदेहाच्या शोधासाठी दिल्लीच्या जंगलात आणि इतर भागात शोधमोहीम राबवत आहेत. या प्रकरणात शनिवारी पोलिसांना काही प्रमाणात यश मिळालं आहे. श्रद्धाच्या मृतदेहाचे काही तुकडे पोलिसांना सापडले आहेत. आरोपी आफताबने श्रद्धा वालकरचा निर्घृणपणे खून करत तिच्या मृतदेहाचे 35 तुकडे केले आणि ते विविध ठिकाणी फेकले. याआधी श्रद्धाच्या मृतदेहाचे काही तुकडे सापडले आहेत. त्यानंतर आता आणखी पोलिसांना मृतदेहाचे दोन तुकडे सापडले आहेत. पोलिसांना अद्यापही श्रद्धाचं शीर सापडलेलं नाही. पोलिसांकडून या प्रकरणात कसून तपास सुरु आहे. शनिवारी पोलिसांनी पुन्हा श्रद्धाच्या मृतदेहाच्या तुकड्यांचा शोध घेण्यासाठी मेहरौलीच्या जंगलामध्ये शोधकार्य सुरू केले. यावेळी जंगलाकडे जाणाऱ्या रस्त्यांवर पोलीस तैनात करण्यात आले होते आणि कोणालाही आत जाऊ दिलं जात नव्हतं. या तपासादरम्यान दिल्ली पोलिसांना दोन हाडे सापडली असून ती फॉरेन्सिक तपासणीसाठी पाठवण्यात आली आहेत.

## मुंबई एनसीबीची मोठी कारवाई

## 20 कोटी रुपयांचे कोकेन जप्त, दोन महिलांना ठोकल्या बेड्या

मुंबई एनसीबीने मोठी कारवाई केली आहे. 20 कोटी रुपयांचे 2.800 ग्रॅम कोकेन जप्त केले असून बुटामध्ये लपवून कोकेनची तस्करी करणाऱ्या दोन महिलांना एनसीबीने अटक केली आहे. मरिंडा एस असे अटक करण्यात आलेल्या एका संशयित महिलेचे नाव आहे. मरिंडा आणि आणखी एक महिला दक्षिण आफ्रिकेवरून आल्या होत्या. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वेगवेगळ्या आकाराच्या आठ पॅकेटमधून हे कोकेन आणण्यात आले होते. यासाठी दोन जोड्यांच्या शूजमध्ये आणि दोन पर्समध्ये विशेष पोकळी तयार करून अतिशय काळजीपूर्वक हे कोकेन लपवले होते. परंतु, पोलिसांनी सतर्क राहून कोकेन तस्करीचा प्लान उधळून लावला. एनसीबीने जप्त केलेले



**एनसीबीने मुंबई विमान तळावरून 20 कोटी रुपयांचे कोकेन जप्त केले. मुंबई, गोवा आणि नजीकच्या भागात आगामी सणासुदीच्या काळात ड्रग्जचा पुरवठा करू इच्छिणाऱ्या स्थानिक ड्रग्ज तस्करांकडून याला जास्त मागणी आहे.**

कोकेन दक्षिण अमेरिकेतून आणले होते. मुंबई, गोवा आणि नजीकच्या भागात आगामी सणासुदीच्या काळात ड्रग्जचा पुरवठा करू इच्छिणाऱ्या स्थानिक ड्रग्ज तस्करांकडून याला जास्त मागणी आहे. मुंबईतील एनसीबी अधिकाऱ्यांना माहिती मिळाली की, 20 नोव्हेंबर रोजी इथिओपियाची राजधानी आदिस अबाबा येथून मुंबईला एक विमान येणार होते. यातून कोकेनची तस्करी करण्यात येत आहे. मिळालेल्या माहितीनुसार मुंबई एनसीबीच्या अधिकाऱ्यांनी तत्काळ मुंबई विमानतळावर धाव घेत संबंधित महिलेला पकडण्यासाठी सापळा रचला. अदीस अबाबाहून आलेले विमान मुंबई विमानतळावर पोहोचताच त्या महिलेला पोलिसांच्या पथकाकडून अडवण्यात आले. यावेळी तिची झडती घेण्यात आली. त्यावेळी तिच्या साहित्यातून 2.800 किलो उत्तम दर्जाचे कोकेन जप्त करण्यात आले. हे कोकेन संशयास्पद वस्तूंमध्ये काळजीपूर्वक लपवून ठेवले होते.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मरिंडा एस नावाची दक्षिण आफ्रिकन महिला विमानतळावर पकडली गेली. अधिक चौकशीत तिने हे कोकेन मुंबईतील एच. मुसा या नायजेरियन नागरिकाला पुरवले जाणार असल्याचे उघड झाले. अटक करण्यात आलेल्या महिलांची स्थानिक आणि ऑफशोअर देशांमध्ये असलेल्या किंगपिनबद्दल अधिक माहिती गोळा करण्यासाठी चौकशी केली जात आहे.

## कल्याण: रेल्वे प्रवाशांना लुटणारे उल्हासनगरमधील चोरटे अटकेत

रात्रीच्या वेळेत रेल्वे स्थानकात किंवा फलाटाच्या बाजुला एकट्या असलेल्या प्रवाशाला गाठून त्याची लूटमार करणाऱ्या, प्रसंगी त्याच्यावर हल्ला करणाऱ्या उल्हासनगर मधील तीन चोरट्यांना कल्याण लोहमार्ग पोलिसांनी अटक केली आहे. यामधील एक चोरटा सराईत गुन्हेगार आहे. त्याच्यावर उल्हासनगरच्या हिललाईन पोलीस ठाण्यात १० आणि शिवाजीनगर पोलीस ठाण्यात दोन गुन्हे दाखल आहेत. रोहीत मुकेश तेजी उर्फ रितिक (२१, रा. महात्मा फुले नगर झोपडपट्टी, लालचक्की, उल्हासनगर-५), लखन मनोहर गायकवाड (२२, खडेगोळवली, पंचवटी कॉलनी, उल्हासनगर), दीपक लक्ष्मण वासकर उर्फ पांड्या (२८, रा.



जोतसना कॉलनी, लाल चक्की, खदान रोड, उल्हासनगर) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. पोलिसांनी सांगितले, गेल्या महिन्यात रात्रीच्या वेळेत उल्हासनगर रेल्वे स्थानकातील एक प्रवासी लघुशंकेसाठी रेल्वे मार्गातून चालला होता. यावेळी अंधाराचा फायदा घेऊन रोहीत, लखन आणि पांड्या यांनी प्रवाशाला गाठले. त्याला त्यांनी पकडून ठेऊन त्याच्या खिशातील रोख रक्कम, मोबाईल काढून घेतला. प्रवाशाने प्रतिकार करताच एका चोरट्याने प्रवाशाला चाकुचा धाक दाखवून हल्ला करण्याची धमकी दिली. पैसे, मोबाईल चोरीला गेल्यामुळे प्रवाशाने कल्याण लोहमार्ग पोलीस ठाण्यात तक्रार केली. लोहमार्ग पोलिसांनी उल्हासनगर रेल्वे स्थानक भागातील सीसीटीव्ही कॅमेरे तपासले. त्यामध्ये आरोपींचे चेहरे दिसत होते. त्या आधारे तपास करुन पोलिसांनी उल्हासनगर मधील झोपडपट्टी भागातून आरोपींना अटक केली. रोहीत उर्फ रितीक हा खतरनाक गुन्हेगार आहे. कल्याण लोहमार्ग पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ निरीक्षक अर्चना दुसाने यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली.या आरोपींनी आणखी इतर ठिकाणी प्रवाशांची लुटमार, चोऱ्या केल्या आहेत का याचा तपास पोलीस करत आहेत.

## मुंबईत ठाकरे-शिंदे गट पुन्हा आमने-सामने

## विकासकामाच्या श्रेयवादावरून जोरदार घोषणाबाजी



अलीकडेच ठाण्यातील वागळे इस्टेट परिसरातील किसननगर येथे ठाकरे आणि शिंदे गटात जोरदार राडा झाला होता. या वादात एकनाथ शिंदे यांच्या समर्थकांनी ठाकरे गटातील दोन कार्यकर्त्यांना जबर मारहाण केली होती. ठाकरे गटाचे खासदार राजन विचारे यांच्यासमोरच ही मारहाण झाल्याने परिसरात तणाव निर्माण झाला होता. ही घटना ताजी असताना आता मुंबईतील प्रभादेवी येथील विकासकामाच्या श्रेयवादावरून ठाकरे आणि शिंदे गट आमने-सामने आले आहेत.

मुंबईतील प्रभादेवी परिसरातील रस्त्याचं आणि पदपथाच्या कामावरून दोन्ही गट आमने-सामने आले आहेत. शिंदे गटाचे माजी नगरसेवक समाधान सरवणकर यांच्या कार्यकाळात संबंधित कामाला सुरुवात झाली होती, असा दावा शिंदे गटाकडून केला जात आहे. त्यामुळे या कामाचं उद्घाटन समाधान सरवणकर यांच्या हस्ते करण्यात येत होतं. पण यावर ठाकरे गटाकडून आक्षेप घेण्यात आला आहे. संबंधित काम ठाकरे गटाचे स्थानिक आमदार अजय चौधरी यांनी केल्याचा दावा ठाकरे गटाकडून करण्यात आला. यावेळी घटनास्थळी ठाकरे गटाने जोरदार घोषणाबाजी केली.

त्यामुळे काही वेळासाठी परिसरात तणावाचं वातावरण निर्माण झालं होतं. पण पोलिसांनी हस्तक्षेप केल्यामुळे कार्यकर्त्यांनी घोषणाबाजी थांबवली आहे. यावेळी पोलिसांनी काही कार्यकर्त्यांना ताब्यातही घेतलं आहे. पोलिसांच्या मध्यस्थीनंतर तणाव निवळला आहे.

## सेफ्टी बेल्ट पंपात अडकल्याने कामगाराचा मृत्यू

**महाड :** औद्योगिक क्षेत्रातील कारखान्यामध्ये पावसाळी शेड काढण्याचे काम करत असताना कमरेला बांधलेला सेफ्टी बेल्ट पंपात अडकून एका कामगाराचा जागीच मृत्यू झाला. शुक्रवारी ही घटना घडली. प्रदीप सोमा खैराडे (वय ३५, रा. चिपळूण) असे मृत कामगाराचे नाव आहे. प्रदीप हे श्रीहरी केमिकल या कारखान्यामध्ये पावसाळ्यात टाकण्यात आलेली शेड काढण्याचे काम ठेकेदाराच्या अंतर्गत करत होते. हे काम करून ते शेडवरून खाली उतरत असताना त्यांनी कमरेला बांधलेला सेफ्टी बेल्ट सांडपाण्याच्या पंपात अडकला आणि तो गुंडाळला गेल्याने त्यात अडकून त्यांचा जागीच मृत्यू झाला.

## कंटेनरच्या धडकेत एकाचा मृत्यू

**नवीन पनवेल :** तालुक्यातील तळोजा, भारत पेट्रोल पंपाच्या जवळ झालेल्या अपघातात कंटेनर खाली सापडून मोटार सायकलस्वाराचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या अपघाताची नोंद तळोजा पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. जाबीद हुसेन हा भावाला घेण्यासाठी दहिसर येथे मोटार सायकलवरून येथ असताना, तळोजा गावाजवळील भारत पेट्रोल पंपाजवळ उजव्या बाजूने येणाऱ्या कंटेनर चालकाने जाबीद हुसेन याला धडक दिली. या धडकेत हुसेन हा डाव्या बाजूने जाणाऱ्या दुसऱ्या कंटेनरच्या पाठीमागील चाकाखाली आल्याने त्यात तो गंभीररीत्या जखमी होऊन मयत झाला.

## मुंबई–गोवा महामार्गावरील खड्डे 4 जानेवारीपूर्वी बुजवण्याचे मुंबई उच्च न्यायालयाचे निर्देश

मुंबई : मुंबई गोवा महामार्गावरील खड्ड्याची समस्या गेल्या अनेक वर्षांपासून असल्याने या विरोधात मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात आली होती. या याचिकेवर आज सुनावणी दरम्यान न्यायालयाने भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्रधिकरणाला रस्त्यावरील खड्डे त्वरित बुजवण्याचे निर्देश (Mumbai HC directive fill potholes ) दिले आहेत. खड्डे बुजवल्याचा अहवाल पुढील सुनावणी दरम्यान न्यायालयासमोर ठेवण्याचे आदेश आज मुख्य न्यायमूर्ती दीपांकर दत्ता व न्यायमूर्ती माधव जामदार यांच्या खंडपीठाने एनएचएआयला दिले आहे. गाड्या चालू शकतात म्हणजे रस्ता चांगला का? मुंबई गोवा महामार्गाच्या दुर्दशेबाबत मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात आली होती. यावर आज उच्च न्यायालयात सुनावणी दरम्यान प्रशासनाला



खडे बोल सुनावले असून लवकरात लवकर खड्डे बुजवण्याचे निर्देश दिले आहेत. मुंबई गोवा महामार्ग चौपदरी रस्ता होत आहे. त्यामुळे रस्त्यावरील खड्डे बुजवले जात नाही. रस्त्याची दुर्दशा झाली असून अपघाताचे प्रमाण वाढले आहे, असे याचिकेत म्हटले आहे. आजच्या सुनावणीस यावेळी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने हा रस्ता गाडी नेण्यास योग्य असल्याचा दावा करण्यात आला होता. मात्र यावर देखील न्यायल्याने प्राधिकरणाला विचारले की, फक्त गाड्या चालू शकतात म्हणजे रस्ता चांगला का? त्यावर खड्डे असतील तरी चालतील का ? तर तुम्ही न्यायालयाला गंभीर घेत नसल्याचे निरीक्षण नोंदवले. कोर्टाने लवकरात लवकर खड्डे बुजवण्याचे आदेश दिले असून पुढील सुनावणी 4 जानेवारी रोजी ठेवण्यात आली आहे. न्यायालयाकडून मनाई आदेश होऊ नये - भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने घेतलेल्या भूमिकेबाबत उच्च न्यायालयाने म्हटले की, पायाभूत विकास प्रकल्प महाराष्ट्रात आणि त्याच्या कामाला मनाई आदेश दिल्लीत होतो. पायाभूत विकास प्रकल्पावर परिणाम होईल किंवा तो लांबेल अशी शक्यता असल्यास न्यायालयाकडून मनाई आदेश होऊ नये अशी स्पष्ट तरतूद केंद्र सरकारनेच सुधारित कायद्याद्वारे केलेली आहे.

## विवाहितेची गळा आवळून हत्या; तीन आरोपींना जन्मठेपेची शिक्षा

विवाहितेची गळा आवळून हत्या केल्या प्रकरणी तीन आरोपींना माणगाव सत्र न्यायालयाने दोषी ठरवले आहे. तिघांनाही न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली आहे. नरेंद्र मनोहर इंगळे, मनोहर गोविंद इंगळे, रंजना मनोहर इंगळे अशी शिक्षा सुनावण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. सदर घटना महाड एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत भावे पठार गावात २०११ साली घडला होता. मयत आरती इंगळे हिचा पती आणि त्याच्या आई वडिलांकडून सतत जाच सुरु होता. यातून वादावादी आणि भांडणे होत



होती. ३१ ऑक्टोबर २०११ रोजी मयत आरती इंगळे आणि सासू रंजना इंगळे यांच्यात असेच भांडण झाले होते. भांडणानंतर आरोपींनी कट रचून मयत आरती इंगळे हीचा काटा काढण्याचा निर्णय घेतला. यानंतर आरोपींनी तीचे हात धरून ठेवले. आधी विळयाने तीचे नाक कापले, ओढणीने गळा आवळून तीची हत्या केली. नंतर पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने तीचा मृतदेह भावे पठार येथील बोरीचा आड विहीरीत नेऊन टाकला. या प्रकरणी महाड एमआयडीसी पोलीस ठाण्यात भा.द.वि. कलम ३०२,२०१,१२०(ब), ४९८(अ),३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. सहाय्यक पोलीस निरीक्षक धन्यकुमार गोडसे यांनी या प्रकरणाचा तपास करून दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले. या प्रकरणाची सुनावणी अतिरीक्त सत्र न्यायाधीश एन एस कोले यांच्या न्यायालयात झाली.

## पनवेल न्यायालयात आरोपीचा पोलिसांवर हल्ला

पनवेल: न्यायालयाने सुनावणी दरम्यान संशयित आरोपीला ८ डिसेंबर ही पुढील तारीख दिली. मात्र त्या संशयिताला पोलीसांच्या ताब्यात न राहता घरी जायचे होते. त्यामुळे वैतागलेल्या संशयित आरोपीने पोलिसालाच मारहाण करण्यास सुरुवात केली. शनिवारी दुपारी सव्वा तीन वाजता पनवेल येथील न्यायालयात पहिल्या मजल्यावर महिला वकिलांच्या कक्षाबाहेर ही घटना घडली. संशयित आरोपी संतोष याला करोनाकाळात पत्नीच्या खूना प्रकरणी अटक केली आहे. करोना संसर्गामुळे संतोषला विलगीकरणात ठेवले होते. संतापलेल्या संतोषने तिचा खून केला होता. संतोष याच्यावर पुन्हा एकदा पोलीस कर्मचा-यावर मारहाण आणि सरकारी कामात अडथळा असे गुन्हे नोंदविण्यात आले





आहेत. ४२ वर्षीय संतोष पाटील हा संशयित आरोपीला घेऊन पोलीस कर्मचारी ओंकार ठाकरे हे पनवेल न्यायालयात आले होते. न्यायमूर्तींनी संतोषला ८ डिसेंबर ही तारीख दिल्याने पोलीस संतोषला घेऊन पहिल्यामजल्यावरुन जात असताना पहिल्या मजल्यावरील संरक्षक भिंतीजवळ आल्यावर संतोष याने तळोजा कारागृहात जाण्यापेक्षा त्याला घरी पाठवावे असा हट्ट पोलीसांसमोर केला. पोलीस व संतोष यांच्यात शाब्दिक बाचाबाची झाली. संतोषने पोलीस कर्मचाऱ्याला मारहाण करण्यास सुरुवात केली. पोलीसांचा गणवेश सुद्धा फाडण्याचा प्रयत्न संतोषने केला. पोलीसाला जखमी केल्याने संतोषवर पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

## बुलढाणा : मलकापूर पांग्रा येथील पेट्रोल पंपावर दरोडा, अडीच लाखांची लूट

सिंदखेडराजा तालुक्यातील साखरखेर्डा पोलीस ठाणे अंतर्गत येत असलेल्या मलकापूर पांग्रा येथील श्रीयान पेट्रोल पंपावर दरोडा घालून अडीच लाखांची लूट करण्यात आली. रविवारी २० नोव्हेंबरला रात्री साडेनऊ वाजताच्या दरम्यान ही खळबळजनक घटना घडली. चारचाकी गाडीतून आलेल्या चार दरोडेखोरांनी पेट्रोल भरण्याचा बहाणा करून केबिनमध्ये प्रवेश केला. आत झोपलेल्या कर्मचाऱ्यांना जबर मारहाण करून केबिनमध्ये असलेले अडीच लाख रुपये लुटून नेले. घटनेची माहिती मिळतात साखरखेर्डा, बीबी व किनगाव राजा येथील पोलीस




घटनास्थळी दाखल झाले. दरोडेखोर व त्यांचे वाहन सीसीटीव्हीमध्ये कैद झाले आहे. दरम्यान, पोलिसांनी नाकेबंदी केली असून पोलीस दरोडेखोरांच्या मागावर आहेत. दरम्यान, मलकापूर पांग्रा पेट्रोल पंप लुटल्यानंतर ते सुलतानपूर येथील कालिंका पेट्रोल पंपावर दरोडा टाकत असताना तेथील कर्मचारी आणि दरोडेखोरात झटापट झाली. कर्मचाऱ्यांनी प्रतिकार करताच दरोडेखोर घटनास्थळीच चोरीची गाडी सोडून पसार झाले. या झटापटीत एक दरोडेखोर जखमी झाल्याची माहिती आहे. घटनास्थळी रात्रीच उपविभागीय पोलीस अधिकारी विलास यामावार यांनी भेट दिली असून आज, सोमवारी अप्पर पोलीस अधीक्षक बी.बी. महामुनी, मेहेकर ठाणेदार निर्मला परदेशी यांनीही घटनास्थळाची पाहणी केली आहे. घटनेचे सीसीटीव्ही फुटेज पोलिसांच्या हाती लागले असून चार दरोडेखोर हे याच भागातील असल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात येत आहे. लवकरच आरोपींना जेरबंद करण्यात येईल असा विश्वास साखरखेर्डाचे ठाणेदार जितेंद्र आडोळे यांनी व्यक्त केला आहे.

# पोलीस बातमी पत्र

मुंबई

मुंबई, मंगळवार २२ ते २८ नोव्हेंबर - २०२२



## सामना हवामान बदलाचा

**सध्या हवामान बदलाचा काळ आहे. दिवसभर ऊन असतं आणि रात्री सुखद गारवा अनुभवायला मिळत आहे. त्यातच वाढत्या प्रदूषणामुळे विविध आजारांनी डोकं वर काढलं आहे. खोकला, घशात खवखव, घसा दुखणं, श्वास घ्यायला त्रास होणं, ताप, डोकेदुखी अशा तक्रारी घेऊन डॉक्टरांकडे जाणाऱ्या रुग्णांची संख्या वाढते आहे. म्हणूनच या दिवसात आरोग्याची विशेष काळजी घ्यायला हवी.**

**सरळ, साध्या उपायांनी आपण या आजारांना दूर ठेवू शकतो. तसंच त्यांची तीव्रताही कमी करू शकतो.**

✲ सध्याच्या काळात गरम पाण्याच्या गुळण्या केल्यास घशाला आराम मिळू शकतो. घशात खवखव, घसादुखीसारख्या समस्या असतील तर गरम पाण्याने गुळण्या करा. गरम पाण्याच्या गुळण्यांमुळे घशाचा जंतुसंसर्ग, सूज दूर व्हायला मदत होते. तसंच तोंडातले जंतूही मरतात.

✲ या दिवसात हळद घातलेलं दूध प्यायल्याने बरेच लाभ मिळू शकतात. हळद गरम असल्याने थंडीत ती खायला हवी. हळदीच्या दुधाने शरीरातील घातक बॅक्टेरियांचा नाश होतो. तसंच घसादुखीत आराम मिळतो.

✲ घसा दुखत असल्यास थंड पदार्थ खाऊ नका. त्याऐवजी गरम पदार्थ खा. गरम पेयं प्या. घशाशी संबंधित कोणत्याही त्रासाकडे दुर्लक्ष करू नका. तातडीने डॉक्टरांचा सल्ला घ्या. सुरुवातीला साधा वाटणारा त्रास पुढे रौद्र रुप धारण करू शकतो..त्यामुळे वेळीच काळजी घ्या.

✲ सतत आजारी पडणं, सर्दीखोकला होणं ही रोगप्रतिकारकशक्ती क्षीण झाल्याची लक्षणं असतात. त्यामुळे प्रतिकारकशक्ती बळकट करण्यासाठी प्रयत्न करा. क जीवनसत्त्वामुळे रोगप्रतिकारकशक्तीला चालना मिळते. त्यामुळे क जीवनसत्त्वयुक्त घटकांचं सेवन करा. लिंबू, संत्री, आवळा अशा आंबट फळांमधून क जीवनसत्त्व मिळतं. त्यामुळे त्यांचं सेवन करा.

✲ सर्दी, खोकला, घसादुखी असल्यास वाफ घ्या. गरम वाफेमुळे तुम्हाला बरं वाटेल.

✲ तापमानातल्या चढ-उतारांमुळे तसंच वाढत्या प्रदूषित घटकांमुळे दम्याच्या रुग्णांना त्रास होऊ शकतो. त्यामुळे या काळात दम्याच्या रुग्णांनी विशेष काळजी घ्यायला हवी.

श्वास घ्यायला त्रास होत असेल तर नाकात शुद्ध तुपाचे एक किंवा दोन थेंब घाला. यामुळे श्वासनलिका स्वच्छ होऊन त्रास कमी होईल.



## डेंग्यूचा विळखा

**देशात दरवर्षी डेंग्यूचा कहर पाहावयास मिळत आहे. डेंग्यूमुळे हजारो नागरिक आजारी पडत असून या रुग्णांनी दवाखाने खचाखच भरलेले आहेत. काहींचा दुर्दैवी मृत्यू देखील होत आहे. दरवर्षी पावसाळ्यानंतर देशभरात डेंग्यूचे हजारो रुग्ण आढळून येतात. डेंग्यूचा फैलाव झाल्यानंतर प्रशासन आणि डॉक्टरांकडून सर्वसामान्य जनतेला काळजी घेण्याच्या सूचना दिल्या जातात. गल्लोगल्ली फवारणी केली जाते. तरीही प्रारंभीच्या टप्प्यात असलेल्या डेंग्यूचा प्रसार होणार नाही याची काळजी घेण्यात मात्र निष्काळजीपणा दाखविला जातो. रुग्णालयातील अस्वच्छता ही रुग्णाला बरे करण्याऐवजी आणखी आजारी पाडण्याचे काम करते, तर प्रशासकीय हलगर्जीपणा हा आरोप- प्रत्यारोपातून दिसून येतो. एकमेकांवर खापर फोडून जबाबदारीतून पळ काढणाऱ्या प्रशासनामुळे डेंग्यूसारखे साथजन्य आजार फैलावण्यास हातभार लागत आहे.**

देशात डेंग्यूचे वाढते रुग्ण हे आरोग्य विभागासमोरील मोठे आव्हान ठरत आहे. अनेक ठिकाणी डेंग्यूमुळे नागरिकांचा मृत्यू होण्याच्या बातम्या सतत येत आहेत. उत्तर प्रदेश असो, उत्तराखंड असो, पंजाब असो, हरियाणा असो, दिल्ली असो, राजस्थान असो, बिहार असो किंवा झारखंड असो, प्रत्येक राज्यांत डेंग्यूने थैमान घातले आहे. ठिकठिकाणच्या रुग्णालयात डेंग्यूचे रुग्ण वाढल्याने सोशल मीडियावर प्लेटलेट्सची मागणी करणाऱ्या मेसेजची संख्या देखील तितकीच वाढली आहे. वास्तविक डेंग्यू झाल्यानंतर रुग्णांतील प्लेटलेट्स बऱ्याच प्रमाणात कमी होतात आणि प्लेटलेट्सची संख्या खूपच कमी झाली तर जीवाला धोका निर्माण होतो. दिल्लीत तर यंदा डेंग्यूच्या रुग्णांची संख्या ही गतवर्षीच्या तुलनेत विक्रमी मानली जात आहे. दिल्ली महानगरपालिकेच्या मते, दिल्लीत सप्टेंबर महिन्यांत डेंग्यूचे ६९३ रुग्ण आढळून आले तर ऑक्टोबर महिन्यांत एक हजारापेक्षा अधिक रुग्ण सापडले आहेत. ही संख्या २०१७ नंतरची सर्वाधिक आहे. दिल्लीत आतापर्यंत डेंग्यूचे २२०० पेक्षा अधिक रुग्ण आढळून आले आहेत. त्याचबरोबर मलेरियाचे रुग्ण देखील वाढत चालले आहेत. देशातील अन्य भागात डेंग्यूची स्थिती चिंताजनक आहे. डेंग्यूचा प्रकोप हा पूर्वीपेक्षा अधिक भयंकर असून तो आणखीच व्यापक होत चालला आहे. कारण डेंग्यूबरोबरच रुग्णाला मलेरियाची लागण होत आहे. दोन्ही आजारांनी एकाचवेळी हल्ला केल्याने रुग्णाची स्थिती अधिकच गंभीर होताना दिसत आहे.

देशात डेंग्यूचे हजारो रुग्ण आढळून येत असतानाही जवळपास सर्वच राज्यांत ठिकठिकाणी साचलेला कचरा आणि घाण याची योग्य रीतीने विल्हेवाट होताना दिसून येत नाही. अनेक रुग्णालयात स्वच्छतेचा अभाव असल्याने डासांचे वाढलेले प्रमाण दिसून येत आहे. साफसफाई नियमित होत नसल्याने आणि स्वच्छता होत असली तरी ती योग्य रीतीने केली जात नसल्याने रुग्णाची मानसिकता आणखीच बिघडते.

प्रशासकीय निष्काळजीपणा सर्वश्रुत आहे. कोणताही आजार पसरला की जबाबदारी झटकण्याची चढाओढ लागते. वास्तविक डेंग्यू दरवर्षी होतो. मात्र दर तीन ते चार वर्षांच्या खंडानंतर जेव्हा डेंग्यू महासाथीचे रुप धारण करतो तेव्हा आपले सरकार आणि स्थानिक प्रशासन कुंभकर्णी झोपेतून खडबडून जागे होते. जनजागृती मोहिमा सुरू केल्या जातात, फवारणी सुरू होते. परंतु तोपर्यंत डेंग्यूने आपले स्थान बळकट केलेले असते. डेंग्यू हा व्हायरल आजार आहे. तो आपल्या घराजवळ साचलेल्या पाण्यात वाढतो. एडिस नावाचा डास चावल्यानंतर डेंग्यू होतो. काळ्या रंगाचा स्पॉटेड डास असून तो दिवसा चावतो. डेंग्यूचा संसर्ग शरीरात गेल्यानंतर तो थेट रोगप्रतिकारक शक्तीवरच हल्ला करतो. वेळीच या डासांचा नायनाट केला तरच या आजारापासून आपला पूर्ण बचाव होऊ शकतो. वास्तविक पावसाळ्यानंतर डेंग्यूचा प्रकोप अधिक दिसून येतो. डेंग्यू दोन ते पाच दिवसांच्या आत गंभीर रुप धारण करतो. अशावेळी बाधित व्यक्तीला ताप येण्याचे थांबते आणि रुग्णाला बरे झाल्यासारखे वाटते. प्रत्यक्षात स्थिती वेगळीच असते आणि ही स्थिती गंभीरही राहू शकते. अर्थात डेंग्यू झाल्यानंतर शरीरात कोणकोणती लक्षणे दिसून येतात, हे जाणून घेणे महत्त्वाचे ठरते. काही लक्षणे वेगळी असू शकतात. खूप ताप येणे, घसा खवखव करतो, थंडी वाजणे, डोकेदुखी, थकवा, कंबर किंवा डोळे दुखणे, हिरड्यातून, मूत्र मार्गातून रक्त येणे, उलटी, मळमळ होणे, स्नायू आणि सांधेदुखी होणे, शरीरावर लाल चट्टे येणे, प्लेटलेटची संख्या घसरणे यासारख्या लक्षणांचा समावेश आहे.

आजार कोणताही असो, उपचारापेक्षा त्यापासून खबरदारी घेणे हे अधिक महत्त्वाचे ठरते. डेंग्यूच्या प्रकरणात बचाव हेच मोठे शस्त्र आहे. आपल्या घराजवळ आणि परिसरात डेंग्यूचा प्रसार होणार नाही, याची काळजी घ्यायला हवी. डेंग्यूची लक्षणे दिसताच डॉक्टरांकडे तत्काळ जायला हवे आणि उपचार सुरु करणे गरजेचे आहे. रुग्णाला पौष्टिक आणि संतुलित आहार देणे गरजेचे आहे. आयुर्वेदिक तज्ज्ञांच्या मते, डेंग्यू झालेल्या रुग्णाला तुळस लाभदायी आहे. तुळशीची आठ ते दहा पाने ग्लासभर पाण्यात उकळावीत. पाणी निम्मे झाल्यानंतर ते पाणी रुग्णास द्यावे. नारळाचे पाणी देखील द्यावे. यात इलेक्ट्रोलाइट्स असते. तसेच मिनरल्सचा देखील चांगला स्रोत म्हणूनही त्याकडे पाहिले जाते. परिणामी शरीरातील रक्तपेशीची कमतरता भरून काढण्यासाठी मदत मिळते. याशिवाय पपईच्या पानांचा रस हादेखील प्लेटलेटस् वाढवण्यास उपयुक्त ठरतो, असे वैद्यकीय तज्ज्ञांचे म्हणणे आहे. गुळवेलासारखी वनौषधीही यामध्ये लाभदायक ठरते. व्हिटॅमिन सी देखील शरीराची इम्यून सिस्टिम चांगली राहण्यासाठी मदत करते. यासाठी आवळा, संत्रा, मोसंबी यासारखी व्हिटॅमिन सीयुक्त भरपूर फळे रुग्णाला द्यावीत. ताप आल्यानंतर पॅरासिटॅमॉल द्यावी. कोणत्याही स्थितीत रुग्णाचा ताप वाढणार नाही, याची काळजी घ्यावी. मात्र अशा रुग्णास ॲस्प्रिन, ब्रुफेन आदी वेदनाशामक गोळ्या देऊ नयेत. कारण त्याचा विपरीत परिणाम शरीरावर होऊ शकतो.

## अतितणावामुळे हृदयविकाराचा धोका जादा

'न्यूबर्ग डायग्नोस्टिक्स' पॅनल चर्चेत सदस्य मंडळाने 'अतितणाव व हृदयविकार झटका' या विषयासंबंधी जागरुकता निर्मितीची आवश्यकता असल्याचे स्पष्ट केले. आपल्या हृदयाचे आरोग्य कायम देखरेखीखाली ठेवणे महत्त्वाचे असल्याचा मुद्दा या चर्चेतून अधोरेखित करण्यात आला. वयोगट कोणताही असो, लोकांनी घरच्या घरी 'ॲम्ब्युलटरी ब्लड प्रेशर मॉनिटरिंग' साठी उपलब्ध विविध उपकरणांद्वारे रक्तदाब तपासणे आवश्यक ठरते. हृदयविकाराच्या झटक्यासाठी निरनिराळे पारंपरिक धोके जबाबदार असून अतितणाव हा प्रमुख घटकांपैकी एक घटक हृदयाच्या आरोग्यावर विपरीत परिणाम करतो. कारण ही स्थिती शरीराच्या धमन्यांना प्रभावित करते.

उच्च रक्तदाब असल्यास रक्ताचा दबाव सातत्याने धमन्यांच्या भिंतींच्या विरुध्द धक्का देत राहतो. त्यामुळे हृदयाला रक्त पंप करण्यासाठी जोराने कार्य करणे आवश्यक ठरते. कालानुरुप, हृदयावर पडणाऱ्या ताणामुळे हृदयाचे स्नायू कमकुवत होतात आणि त्यांची कार्यशीलता मंदावते. अतिताणाने बेजार झालेल्या हृदयाचे काम कायमचे थांबते. मधुमेह, कोलेस्ट्रॉल, आळशी जीवनशैली, अतिमहत्त्वाकांक्षा तसेच ताण, अतिव्यायाम करणे, हवेचे प्रदूषण, धूम्रपान तसेच अनारोग्यदायक आहार आणि जीवनशैली ही हृदय विकारामागील प्रमुख कारणे आहेत.

मुंबईतल्या फोर्टीस हॉस्पिटल्समधल्या 'इंटरवेंशनल कार्डिओलॉजी'चे कन्सल्टंट डॉ. विवेक महाजन म्हणाले की, रक्तदाबाशी संबंधित औषधासोबत काही औषधे घेतल्यास रक्तदाब वाढू लागतो. याला कारणीभूत ठरणाऱ्या वेदनाशामक गोळ्यांच्या काही वर्गवाऱ्या म्हणजे आयब्यूप्रोफेन तसेच डायक्लोफेनॅक इत्यादी. अतिताणाला कारणीभूत अन्य औषध गट म्हणजे नाकाद्वारे सर्दीसाठी घेण्यात येणारे ड्रॉप, गर्भनिरोधक गोळ्या तसेच ज्येष्ठमधासारखी काही आयुर्वेदिक औषधे आणि स्टेरॉइडस. ते पुढे म्हणाले की, आजच्या काळात अगदी शाळकरी विद्यार्थीदेखील अतितणावग्रस्त असतात. अतिप्रमाणात खाणे, असंतुलित जीवनशैली, भाज्या आणि फळसेवनाचा अभाव असे काही जोखमीचे घटक प्राथमिक स्वरुपातल्या अतितणावाला जबाबदार ठरतात. त्यामुळे कायम या वयोगटाकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

डॉ. अजित के. एन. म्हणाले की, कधीही प्रतिबंध हा उपायापेक्षा उत्तम ठरतो. त्यामुळे ठरावीक अंतराने आपला रक्तदाब तपासून घेणे फार महत्त्वपूर्ण ठरते. काही लक्षणे दिसोत वा न दिसो; त्यासोबत संतुलित जीवनशैली, आहारातला मिठाचा समावेश तपासणे, मोसमातील फळे खाणे, पुरेशी झोप घेणे, वजन योग्य राखणे. तसेच शारीरिक व्यायाम पेशींचे पुनरुज्जीवन करण्यासाठी, आरोग्यदायक राहण्यासाठी तसेच रक्तदाब प्रतिबंधित करण्यासाठी साह्य करतो. एखादी व्यक्ती औषधोपचार घेत असेल आणि तिचा रक्तदाब दीर्घकाळ स्थिर असेल तर आपण औषधे थांबवू नयेत. तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा. औषधांचे प्रमाण किंवा गोळ्या कमी करण्याविषयी विचारणा करता येईल. कारण अल्प रीडिंगकरता अनेक वेगळे घटक जबाबदार असतात आणि ते स्थिर नसतात.



## हेडफोन, इअरफोनमुळे कान आणि हृदयावरही परिणाम

**सध्याच्या काळात हेडफोन्स आणि इअरफोन हे आपल्या जीवनशैलीचा अविभाज्य भाग बनले आहेत. काम, गाणी आणि प्रवासात 'मल्टिमीडिया कंटेंट' पाहण्यासाठीही हेडफोनचा वापर केला जातो. संगीत ऐकण्यासाठी काही वेळ हेडफोन वापरणं ठीक आहे; पण दीर्घकाळ वापरल्याने आपल्या कानांवर वाईट परिणाम होतो. तसाच तो हृदयावरही होतो.**

हेडफोन किंवा इअरफोनमधून येणारा आवाज कानाच्या पडद्याजवळ आदळतो. त्याच्या अतिवापरामुळे कानाच्या पडद्याचं नुकसान होऊ शकतं. गरजेपेक्षा जास्त वेळ हेडफोन किंवा इअरफोनचा वापर केल्यास आपल्या ऐकण्याच्या क्षमतेवर परिणाम होऊ शकतो. बराच काळ हेडफोन्स लावून गाणी ऐकल्यास कान सुन्न अथवा बधिर होऊ शकतात. यामुळे बहिरेपणाचाही धोका संभवतो. डॉक्टरांच्या मते, इअरफोनच्या अतिवापरामुळे कानात वेगवेगळे आवाज येणं, चक्कर येणं, झोप न येणं अशी अनेक लक्षणं दिसू लागतात.

आपल्या कानांची श्रवण क्षमता केवळ ९० डेसिबल असते, जी हळूहळू ४०-५० डेसिबलपर्यंत कमी होत जाते. हेडफोन किंवा इअरफोन यांचा अतिवापर हा आपल्या कानांसाठी हानिकारक ठरतोच; पण हृदयावरही परिणाम करतो. मोठ्या आवाजात संगीत ऐकल्याने हृदयावर वाईट परिणाम होतो. यामुळे कर्करोगाचाही धोका वाढतो. ऑफिसमध्ये किंवा घरी गाणी ऐकताना इअरफोन्स एकमेकांशी शेअर करणं टाळावं. इअरफोन शेअरिंग केल्याने कानात संसर्ग होण्याचा धोका खूप वाढतो. कानाला होणारा त्रास टाळायचा असेल, तर गरज असेल तेव्हाच इअरफोन किंवा हेडफोनचा वापर करावा. दिवसभरात ६० मिनिटांपेक्षा अधिक काळ इअरफोनचा वापर करू नये. ते धोकादायक ठरू शकतं.



## कच्च्या भाज्या खाणं हानिकारक

**सध्या शाकाहारी आहाराचा ट्रेंड वाढत आहे. आरोग्य सुधारण्यासाठी लोक फक्त फळं आणि भाज्यांपासून बनवलेले पदार्थ खातात. जगभरातल्या आरोग्य तज्ज्ञांच्या मते याचे अनेक फायदे आहेत. हा आहार वजन, कोलेस्टेरॉलची पातळी आणि हृदयविकाराचा धोका कमी करण्यासाठी ओळखला जातो; पण काही लोक कच्च्या भाज्या खातात. कच्च्या भाज्या खाणं आरोग्याच्या दृष्टीने हानिकारक आहे.**

काही लोकांचा विश्वास आहे की, फळं आणि भाज्या शिजवल्याने आवश्यक पोषण तत्त्वं नष्ट होतात. कच्चं अन्न खाल्ल्याने शरीरात ऊर्जा वाढते आणि अनेक आजार दूर होतात किंवा टाळता येतात; परंतु संशोधन सूचित करतं की, कच्चा शाकाहारी आहार चांगल्या आहारापेक्षा जास्त नुकसान करू शकतो. काही भाज्या अशाही आहेत, ज्या शिजवल्यानंतर अधिक पोषक ठरतात. शिजवल्याने काही कच्च्या भाज्यांचं पौष्टिक मूल्य कमी होतं.

लाल भाजी शिजवल्याने त्यातलं थायमिन २२ टक्के कमी होतं. हा व्हिटॅमिन बी १ चा एक प्रकार आहे, जो मज्जासंस्था मजबूत ठेवतो; मात्र काही भाज्या अशा आहेत, ज्या शिजवल्याने पोषण तत्त्वं वाढतात. पालकाची भाजी शिजवल्याने कॅल्शियम अधिक चांगल्या प्रकारे मिळतं. टोमॅटो शिजवल्याने व्हिटॅमिन सी २८ टक्के कमी होऊ शकतं; परंतु लाइकोपीनचं प्रमाण ५० टक्क्यांपेक्षा जास्त वाढतं. यामुळे कर्करोग आणि हृदयविकाराचा धोका कमी होतो. गाजर, मशरूम, शतावरी, ब्रोकोली आणि फुलकोबीदेखील शिजवणं आवश्यक आहे.

कच्च्या शाकाहारी आहारामुळे स्त्रियांमध्ये मासिक पाळीच्या समस्या आणि वंध्यत्व निर्माण होऊ शकतं. कच्च्या शाकाहारी आहाराचं योग्य नियोजन न केल्यास वजन अचानक कमी होऊ शकतं. संशोधकांच्या मते, ४५ वर्षांखालील ३० टक्के महिलांनी तीन वर्षं सतत हा आहार घेतला. या काळात त्यांना मासिक पाळी येणं अर्धवट किंवा पूर्णपणे थांबलं. या स्थितीत असलेल्या महिलांना वंध्यत्व किंवा हाडं कमकुवत होण्याच्या समस्येचा सामना करावा लागतो.

इतर संशोधनात असंही आढळून आलं आहे की नेहमी कच्ची फळं आणि भाज्या खाणाऱ्यांची प्रजनन क्षमता कमकुवत होते. कच्च्या शाकाहारी आहारामध्ये जीवनसत्त्व बी१२, डी, सेलेनियम, जस्त, लोह आणि ओमेगा-३ फॅटी ॲसिड यासारखी आवश्यक जीवनसत्त्वं आणि खनिजं नसतात. एका अभ्यासात आढळून आलं आहे की, कच्चं अन्न खाणाऱ्या ३८ टक्के लोकांमध्ये व्हिटॅमिन बी १२ ची कमतरता होती. यामुळे कावीळ, तोंडावर व्रण येणं, दृश्य विकार, नैराश्य आणि मूड बदलण्याची शक्यता असते.

## संपादकीय...



# मोदींचे जी-20(24)

जी-२० परिषदेचे सूप वाजले आणि जी-२० चे नेतृत्व भारताकडे आले. या नेतृत्वामुळे भारतीय परराष्ट्र व्यवहारासाठी मोठी संधी उपलब्ध होणार आहे. जगभरात होत असलेल्या बदलांमुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना खेळण्यासाठी अनेक संधी मिळणार आहेत आणि त्या संधीचा लाभ कसा उठवायचा, हे मोदींना पक्के ठाऊक आहे.

बालीमधील जी-२० शिखर परिषद अनेक कारणांनी गाजली. या परिषदेत ट्रुडो आणि शी जिनपिंग यांच्यात झालेली शाब्दिक चकमक, मोदी आणि बायडेन व ऋषी सुनक यांच्यात झालेली अनौपचारिक चर्चा, इंडोनेशियाच्या जोको विडोडोकडून मोदींकडे पुढील परिषदेच्या अध्यक्षपदाची आलेली सूत्रे यामुळे भारताला परराष्ट्र व्यवहारामध्ये महत्त्वाचा टप्पा सेट करण्यास उपयुक्त ठरणार आहे.

जागतिक ‘जीडीपी’च्या ८० टक्के आणि जागतिक व्यापाराच्या ७५ टक्के वाटा उचलणाऱ्या भारतामध्ये जी-२० परिषदेचे आयोजन होत आहे, ही नक्कीच इव्हेंट करण्यात वाकबगार असणाऱ्या मोदींसाठी महत्त्वाची संधी आहे. नरेंद्र मोदी सर्वात चांगले इव्हेंट मॅनेजर आहेत, असे धाडसी वक्तव्य लालकृष्ण अडवानी यांनी केले होते.

जी-२० ची होणारी परिषद मोदींसाठी अत्यंत गरजेची आहे. २०२४ च्या निवडणूक मोहिमेची दिशा या माध्यमातून चमकदारपणे सेट करण्यात येईल. त्यासाठी जगभरातील सर्व प्रमुख चेहरे येथे येतील. आपल्या नेत्याची स्तुती करतील. वर्षभर देशभरात शंभर बैठका आयोजित केल्या जातील. त्यामधून वातावरणनिर्मिती होईल आणि या परिषदेचा समारोप चरणसीमेवर पोचलेला असेल. देशांतर्गत राजकारणावर त्याचा परिणाम होईल यासाठी प्रयत्न केला जाईलच. मात्र या सर्वांवर टिपण्णी करताना राजकीय चष्मे काढायला हवेत. तसे केले तरच परदेशी आणि धोरणात्मक बाबींच्या संधी किती महत्त्वाच्या आहेत, हे पाहता येईल. सोव्हिएत साम्राज्याच्या अस्तानंतर तीन दशकांनंतर दोन वर्षांत प्रथमच अस्थिरता निर्माण झाली आहे. त्याला व्लादिमीर पुतीन आणि शी जिनपिंग काही प्रमाणात का होईना कारणीभूत आहेत. सोव्हिएतच्या पतनानंतर जग एकध्रुवीय व्यवस्थेत स्थायिक झाले होते.त्याला नवी महाशक्ती बनू पाहणाऱ्या चीनने आव्हान देण्यास प्रारंभ केला आहे. अमेरिकेच्या कमी होत असलेल्या शक्तीने या कल्पना अधिक दृढ होण्यास मदत झाली आहे. ओबामांनंतर डोनाल्ड ट्रम्प यांनी जागतिकीकरणातून घेतलेली माघार आणि त्यानंतर बायडेन यांनी अफगाणिस्तानातून घेतलेला काढता पाय यामुळे फरक पडला आहे, अन्यथा २०२२ पर्यंत परिस्थिती ‘जैसे थे’च राहिली असती आणि आजच्या जी-२० चे संदर्भ फारसे बदलले नसते. नेमके कशामुळे घडले असे हे जाणून घेऊ.

अमेरिकेपुढे उभी राहत असलेली आव्हाने...वाढती महागाई, नाजूक होणारी अर्थव्यवस्था, युद्धातील सहभागामुळे वाढत असलेला खर्च यामुळे अमेरिकी अर्थव्यवस्थेला धक्का बसला होता.आता ती त्यामधून सावरण्याचा ती यशस्वी प्रयत्न करत आहे. युक्रेनमध्ये रशियाविरोधात युक्रेनला सहकार्य करताना तेथे युक्रेनचे सैन्य देशासाठी लढत आहे, ही बाब महत्त्वाची आहे. त्यामुळेच तेथे अमेरिकेच्या मदतीमुळे सरशी होताना दिसत आहे. तालिबानमध्ये मात्र माघार घ्यावी लागली होती. व्हिएतनाम, इराक, मध्यपूर्वेतील इतरत्र सैन्य पाठवूनही तेथे पराभवच पदरी पडला होता. श्रीलंकेत भारतालाही असाच फटका बसला होता.

तेच बांगलादेश मुक्त करताना तेथील लोकांची भावना तशी होती त्यामुळे भारताने १३ दिवसांत युद्ध जिंकले होते. युक्रेनविरुद्ध रशिया लष्करी, मुत्सद्दी आणि राजकीयदृष्ट्या पराभूत होत आहे. ही मित्रपक्ष असलेल्या भारतासाठी काळजीची बाब आहे. मॉस्कोमधील अंतर्गत राजकारण काहीही असो, रशिया आणि पुतीन कमकुवत होत आहेत. हे भारतासाठी चांगले आहे.

# घरोघरीच्या जेवणाशी भिडणारं आंतरराष्ट्रीय राजकारण

आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये खनिज तेल, शस्त्रास्त्र व्यापार, लष्करी सहकार्य, आण्विक तंत्रज्ञान, अणुभट्ट्या, अणुइंधन हे विषय कायमच मध्यवर्ती असतात. पण, युक्रेन-रशिया युद्ध आणि जागतिक तापमान वाढीचा परिणाम म्हणून या वर्षात अन्नधान्य हा विषय आंतरराष्ट्रीय संबंधांत केंद्रस्थानी आला आहे. आफ्रिकी देशांमधील अन्नधान्य टंचाईचा प्रश्न जागतिक राजकारणात कायमच चर्चेचा विषय असतो. पण, यावर्षी अगदी युरोपीयन युनियनमधील देशांनाही आपल्या अन्नसुरक्षेला अधिक प्राधान्य द्यावे लागले. त्यामुळेच आजवर दुर्लक्षित असलेला अन्नधान्य राजनय आता आंतरराष्ट्रीय संबंधांत मध्यवर्ती भूमिकेत आला आहे. त्या विषयी...इंडोनेशियातील बाली येथे झालेल्या जी-२० देशांच्या शिखर परिषदेत सदस्य देशांनी रशिया विरोधात कठोर भूमिका घ्यावी, असा अमेरिकेचा आग्रह होता. पण, भारतासह अन्य विकसनशील देशांनी त्याला विरोध केला. तसे केल्यास खनिज तेल, खते आणि अन्नधान्यांच्या महागाईचा भडका उडेल आणि ही महागाई सहन करण्याची आर्थिक क्षमता विकसनशील देशांच्या अर्थव्यवस्थेमध्ये राहिलेली नाही, असे अमेरिकेला समजेल अशा स्पष्ट भाषेत सांगण्याचे धाडस या देशांनी दाखविले. त्यामुळे रशिया, रशिया समर्थक देश आणि युक्रेनमधून होणाऱ्या अन्नधान्य, खते आणि खनिज तेलांच्या आयातीवर कोणतेही निर्बंध आणण्यास उघडपणे विरोध करण्यात आला. यापूर्वी अशी अमेरिकेच्या विरोधात जाहीर भूमिका घेण्याचे धाडस विकसनशील दाखवत नव्हते. यावेळी असे घडले कारण अन्नसुरक्षा हा अत्यंत कळीचा मुद्दा ठरला आहे.युक्रेन-रशिया युद्धाने जगाची अन्नसुरक्षा अडचणीत आणली आहे. भारत, चीन हे देश कृषी उत्पादनात जगात अग्रेसर आहेत. पण, या दोन देशांची भूक इतकी प्रचंड आहे की, निर्यातसाठी फारस काही शिल्लकच राहत नाही. भारतात तर एखाद्या शेतीमालाची निर्यात वाढतात देशांतर्गत बाजारात त्या कृषीमालाच्या दराचा भडकाच उडतो. यंदा गव्हाच्या बाबतीत हेच झालं. त्यामुळे भारत आणि चीनमधून अन्नधान्यांची निर्यात अत्यंत किरकोळ होते. त्यामुळेच आजवर अन्नधान्यांची निर्यात करणारा देश अशी भारताची ओळख निर्माण होऊ शकली नाही. ही ओळख युक्रेन आणि रशियाने निर्माण केली आहे.जागतिक गव्हाच्या उलाढालीत या दोन्ही देशांचा वाटा सुमारे तीस टक्के आणि मक्याचा वाटा अठरा टक्के आहे. रशियाच्या तुलनेत अत्यंत लहान असलेल्या युक्रेनचा गव्हाच्या उलाढालीत दहा टक्के तर मक्याच्या उलाढालीत सोळा टक्के वाटा आहे. युक्रेनमधून इजिप्त, येमेन, इस्रायल, इंडोनेशिया, बांगलादेश, इथोपिया, लिबिया, लेबनान, ट्युनिशिया, मोरोक्को, पाकिस्तान, सौदी अरेबिया आणि तुर्की आदी देशांना प्रामुख्याने गहू आणि मक्याची निर्यात होते. जगाला सर्वात कमी दरात गहू पुरविणारे देश म्हणून युक्रेन आणि रशियाची ओळख आहे. यंदा या देशांकडून जागतिक बाजारात गहू गेला नाही म्हणून भारतातून विक्रमी गहू निर्यात झाली, परिणामी सरकारी धान्याची कोठारे यंदा रिकामी राहिली.युक्रेन-रशियामधील गहू किंवा मका आजवर युरोपीयन देशांना जात नव्हता. त्यामुळे अन्नधान्यांच्या बाबत युरोप यापूर्वी कधीच युक्रेन किंवा रशियावर अवलंबून नव्हता. केवळ नैसर्गिक वायू आणि खनिज तेलाच्या बाबत बहुतांशी रशियावर अवलंबून असणारा युरोप यंदा पहिल्याच अन्नधान्यांसाठी युक्रेन-रशियावर अवलंबून आहे. कारण, युरोप पाचशे वर्षांतील सर्वात भीषण दुष्काळाचा सामना करीत आहे.युरोपीय कमिशनने युरोपातील दुष्काळ ऑगस्ट २०२२, या नावाने प्रसिद्ध केलेल्या अहवालात म्हटले आहे, युरोपातील अनेक देशांना वर्षाच्या सुरुवातीपासून दुष्काळाच्या झळा बसल्या आहेत. जुलै, ऑगस्ट महिन्यात या झळा आणखी तीव्र झाल्या होत्या. उष्णतेच्या लाटा या दुष्काळात भर टाकत आहेत. संपूर्ण युरोपातील नद्यांची पातळी घटली आहे, अनेक नद्या कोरड्या पडल्या आहेत. पिण्याचे पाणी, शेतीसाठीचे पाणी आणि जलविद्युत क्षेत्रावर मोठा परिणाम झाला आहे. अन्नधान्यांसह मका, सोयाबीन, कांदा, सफरचंद, शुगर बीट आणि सूर्यफुलाचे उत्पादन



देशनिहाय दहा ते पन्नास टक्क्यांनी कमी झाले आहे.बीबीसी, सीएनबीसी या वृत्तवाहिन्यांसह संशोधन करणाऱ्या अनेक संस्था हा पाचशे वर्षांतील सर्वांत भीषण दुष्काळ असल्याचे सांगत आहेत. जर्मनी, नेदरलॅंड, हॉलंड आणि स्वित्झर्लंड या देशांची अर्थवाहिनी असलेली ऱ्हाईन नदी आणि मध्य युरोपातून काळया समुद्रापर्यंत वाहणारी डॅन्यूब, ओडर, लोरी, पो, वाल या प्रमुख नद्यांसह युरोपातील अनेक नद्या कोरड्या पडल्या होत्या. युरोपातील नद्यांवर अवलंबून असलेली ८० अब्ज डॉर्लसची अर्थव्यवस्था थंडावली होती. या दुष्काळाचा परिणाम म्हणून पुढील हंगामातील पिके हाती येईपर्यंत संपूर्ण युरोपात अन्नधान्यांची टंचाई निर्माण होणार आहे. त्यामुळे संपूर्ण युरोपला आता रशियामधून येणाऱ्या नैसर्गिक वायू, खनिज तेलांसह रशिया-युक्रेनमधील गहू, बार्ली, तृणधान्यांसह मक्यावर अवलंबून राहावे लागणार आहे.अमेरिकेची परिस्थिती याहून वेगळी नाही. यंदा अमेरिकेला पाणीपुरवठा करणाऱ्या मोठ्या धरणांनी तळ गाठला होता. १९३७ नंतरची सर्वात भीषण टंचाई अमेरिकेत निर्माण झाली आहे. वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम आणि अमेरिकेच्या नॅशनल एरोनॉटिक्स ॲण्ड स्पेस ॲडमिस्ट्रेशनने (नासा) जाहीर केलेल्या माहितीनुसार अमेरिकेतील सुमारे २५ दशलक्ष लोकांना पाण्याचा पुरवठा करणारे लेक मीड या जलाशयाने तळ गाठला होता, अशी स्थिती १९३७ नंतर प्रथमच निर्माण झाली होती. कमी पाऊस आणि उष्णतेच्या लाटांमुळे अमेरिकेतील दुष्काळाची तीव्रता वाढत आहे. अमेरिकेच्या कॅलिफोर्निया, टेक्सास, ओरेगॉन, नेवाडा, उटाह आणि न्यू मेक्सिको या राज्यांमध्ये दुष्काळाची परिस्थिती सर्वात गंभीर झाली होती. अमेरिकेच्या कृषी विभागाने प्रसिद्ध केलेल्या अहवालानुसार दुष्काळाचा अमेरिकेच्या कृषी आणि पशुधनावर विपरीत परिणाम झाला. दुष्काळ आणि उष्णतेच्या लाटांमुळे गवतांच्या कुरणांचे मोठे नुकसान झाल्यामुळे पशुधनाचे उत्पादन कमी होऊ शकते. शेतीच्या उत्पादनात मोठी घट झाली आहे. याचा परिणाम स्थानिक, प्रादेशिक आणि राष्ट्रीय अर्थव्यवस्थेमध्ये दिसून येणार आहे. अन्न प्रक्रिया आणि कृषी सेवा क्षेत्रांवर नकारात्मक परिणाम होऊन प्रादेशिक आणि राष्ट्रीय स्तरावर अन्नधान्यांच्या किमती वाढू शकतात. अमेरिकेत उत्पादित होणाऱ्या कापूस, गहू, मका आदी पिकांचे उत्पादन घटणार आहे. पण, सुदैव इतकेच की अमेरिकेला अन्नधान्यांच्या आयातीची गरज पडणार नाही. पण, अमेरिकेतून गहू किंवा मक्याची युरोपीयन देशांना होणारी निर्यात यंदा फारच अल्प असेल. आशियात पाकिस्तानसारख्या देशाला पुराचा इतका फटका बसला आहे की, पाकिस्तानला थेट जागतिक नाणेनिधीच्या दरात झोळी घेऊन उभे रहावे लागले. भारतातही उष्णतेच्या लाटांनी गव्हाच्या उत्पादनात मोठी घट झाली आहे. चीन ६१ वर्षांतील भीषण दुष्काळाचा सामना करीत आहे. सुमारे ४०० दशलक्ष लोकांना पिण्याचे पाणी आणि शेतीसाठी पाणी पुरवठा करणाऱ्या यांगत्से नदीचा प्रवाह रोडावला आहे. नदीकाठावरील भात, मक्याचे पीक अडचणीत आले आहे. या शिवाय पोयांग या सरोवरात फक्त २५ टक्के पाणीसाठा राहिला होता. सिचुआन, हुबई, हुनान, जिआंग्शी, अनहुई, चोंगाकिंग या प्रातांना दुष्काळाचा सामना करावा लागला. यांगत्से आशियातील सर्वात मोठी नदी असून नदीवरील जलविद्युत प्रकल्प बंद झाले होते. शांघायसह अन्य प्रमुख शहरांतील दिवे रात्री बंद केले जात होते. इतक्या भीषण वीज टंचाईला चीन सामोरे जात होते. टेस्ला, टोयाटोसारख्या अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांनी पाण्याअभावी आपले प्रकल्प बंद केले होते. युरोप, अमेरिका आणि आशिया खंडातील दुष्काळामुळे यंदा आफ्रिकेतील दुष्काळाकडे संपूर्ण जगाचेच दुर्लक्ष झाले. रिजनल ह्युमेनेटेरियन ओव्हरव्ह्यू ॲण्ड कॉल टू ॲक्शन, या संस्थेने हॉर्न ऑफ आफ्रिका ड्रॉट या नावाने एक अहवाल प्रसिद्ध केला आहे. या अहवालाने आफ्रिकेतील भीषण दुष्काळी स्थिती जगासमोर आणली आहे. इथिओपिया, केनिया आणि सोमालियाच्या काही भागांमध्ये सलग चार वर्षांपासून दुष्काळ आहे. आफ्रिकेतील अनेक देश उपासमारीचा सामना करत आहेत. मागील ४० वर्षांतील हा मोठा दुष्काळ असल्याचे सांगितले जात आहे. इथिओपिया, केनिया आणि सोमालियामध्ये कमीत कमी १८.६ दशलक्ष लोक आधीच उपासमार आणि कुपोषणाचा सामना करीत आहेत. सोमालिया, इथिओपिया, केनियामधील लोकांचे जगण्यासाठी स्थलांतर सुरू झाल्याचे युनिसेफने म्हटले आहे. युक्रेन गहू आणि मक्यासोबत सूर्यफूल, सूर्यफूल तेल, बार्ली, मोहरीची जगाला निर्यात करतो. या निर्यातीत आशिया,


मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,

भाईंदर पश्चिम, ता.जि. ठाणे. - 401 101

सार्व. आरोग्य विभाग

जा.क्र.मनपा/आरोग्य/ ३८० /2022-23 दि. १८/११/२०२२

// जाहिर फेर निविदा सुचना //

मिरा भाईंदर महानगरपालिका सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत Two wheeled HDPE Bins with lid capacity 120 ltr. व 240 ltr. खरेदी कामाकरीता अनुभवी ठेकेदाराकडून ई-टेंडरींग पध्दतीने फेर निविदा मागविण्यात येत आहेत. (निविदा मंजूर रक्कम 25.00 लक्ष आहे)

फेर निविदा सुचना व कोरे निविदा अर्ज ऑनलाईन पध्दतीने https:\\mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. २१/११/२०२२ ते दि. २८/११/२०२२ रोजी दुपारी 1.00 वाजेपर्यंत उपलब्ध व स्विकारण्यात येतील. सदर कामाची निविदा दि. २९/११/२०२२ रोजी दुपारी 3.00 वाजता उघडण्यात येईल.

| Name of the Tender | Tender form fee | Earnest money deposit | Availability of Tender form & Submission | Online Tender Opening |
|---|---|---|---|---|
| Supply Two wheeled HDPE Bins with lid capacity 120 ltr. व 240 ltr. | Rs. 5,310/- (Tender Fee + GST) | Rs. 75,000/- | Dt. २१/११/२०२२ to Dt. २८/११/२०२२ Upto 1.00 P.M | Dt.२९/११/२०२२ at 3.00 P.M. |

जा.क्र मनपा/जनसंपर्क/३८०/२०२२-२३
दिनांक १८/११/२०२२

सही/-
(रवि पवार)
उपायुक्त (आरोग्य)
मिरा भाईंदर महानगरपालिका


# प्रेमसंबंध तुटल्याने आधी सेल्फी फोटो व्हायरल करण्याची धमकी दिली, मग विविध ठिकाणी नेत अत्याचार

**आंबेगाव :** प्रेमप्रकरण तुटल्यानंतर दोघांचा सेल्फी फोटो व्हायरल करण्याची धमकी देत प्रियकराने वारंवार प्रेयसीवर बलात्कार केल्याची घटना पुण्यातील आंबेगावमध्ये उघडकीस आली आहे. याप्रकरणी पीडित तरुणीच्या तक्रारीवरुन पारगाव पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी आरोपी तरुणाला अटक केली आहे. तुषार पोपट करगळ असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.



आरोपी तुषार करगळ आणि पीडित तरुणी यांचे प्रेमसंबंध होते. यादरम्यान दोघांनी एकत्र सेल्फी फोटो काढले होते. मात्र काही काळाने काही कारणाने त्यांच्यातील प्रेमसंबंध तुटले. प्रेमसंबंध तुटल्यानंतर हे सेल्फी फोटो सोशल मीडियात व्हायरल करण्याची धमकी देत आरोपीने तरुणीवर बलात्कार केला. वारंवार धमकी देत तरुणीच्या घरी आणि जुन्नर येथील एका लॉजवर नेत तरुणीवर बलात्कार केला.

अखेर या अत्याचाराला कंटाळून तरुणीने पारगार पोलिसात धाव घेत तक्रार दाखल केली. तरुणीच्या तक्रारीवरुन पारगाव पोलिसांनी गुन्हा दाखल करत आरोपीला अटक केली. फेब्रुवारी 2020 ते 15 नोव्हेंबर 2022 दरम्यान ही घटना घडली आहे. पुढील तपास पारगाव पोलीस ठाण्याचे सपोनि लहु थाटे यांचे मार्गदर्शनाखाली लोकरे करत आहेत.

तरुणीवर अत्याचार करून त्याचा व्हिडीओ वायरल करण्याची धमकी देत दोन नातेवाईकांनी अत्याचार केल्याची घटना नागपूरमध्ये उघडकीस आली आहे. याप्रकरणी नंदनवन पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. या प्रकरणी दोन आरोपींना अटक केली आहे. यात पीडित तरुणीच्या बहिणीच्या नव-याचाही समावेश आहे. मोहम्मद अरसलान शेख आणि मोहम्मद सरफराज अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत.

# आधी अत्याचार केला, नंतर व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी

**नागपूर :** आधी तरुणीवर अत्याचार करण्यात आला. त्यानंतर तिच्यावर केलेल्या अत्याचाराचा व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देण्यात आली. या प्रकरणी दोघांविरोधात सामूहिक अत्याचाराचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे. नागपुरातील नंदनवन पोलीस स्टेशनच्या हद्दीत हा प्रकार घडला. या प्रकरणात पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली आहे. यात पीडित तरुणीच्या नातेवाईकाच्या नव-याचा समावेश आहे. मोहम्मद अरसलान शेख आणि मोहम्मद सरफराज अशी




अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत.

नंदनवन पोलीस स्टेशन हद्दीतील हसनबाग येथे पीडित तरुणी राहते. २०२१ मध्ये पीडितेच्या जवळच्या नातेवाईकाच्या लग्नाचे बोलणे सुरु होते. आरोपी मोहम्मद अरसलान याची ओळखी पीडितेशी झाली. एक दिवस आरोपीने पीडित तरुणीवर अत्याचार केला.

अत्याचाराचा व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देत अनेकदा त्याने पीडितेवर अत्याचार केला. पीडितेच्या जवळच्या नातेवाईकाशी लग्नानंतरही त्याने हा प्रकार सुरूच ठेवला. या प्रकरणाची माहिती आरोपीच्या दुस-या नातेवाईकाला लागल्यावर त्यानेही व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देत अत्याचार केला.

अखेर पीडित तरुणीने कुटुंबीयांना माहिती दिल्यावर पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली. त्यानंतर पोलिसांनी सामूहिक अत्याचाराचे गुन्हे दाखल करीत दोन्ही आरोपींना अटक केली. अशी माहिती नंदनवनचे पोलीस निरीक्षक किशोर नगराळे यांनी दिली.

पोलीस बातमी पत्र

संमिश्र

४

मुंबई, मंगळवार २२ ते २८ नोव्हेंबर - २०२२

## वरळीतील समुद्रात पाच मुले बुडाली; दोघांचा मृत्यू, तीन जण गंभीर

**मुंबई :** वरळी कोळीवाड्याजवळ समुद्रात पाच मुले वाहून गेल्याची धक्कादायक घटना आज घडली आहे. या पाच जणांना स्थानिक नागरिकांनी बाहेर काढून खासगी आणि केईएम रुग्णालयात दाखल केले. यामधील हिंदुजा रुग्णालयात दाखल केलेल्या 8 वर्षीय मुलाचा आणि 12 वर्षीय मुलीचा मृत्यू झाला आहे. तर इतर तीन मुलांवर खाजगी आणि केएम रुग्णालयात उपचार सुरू आहेत. शिवसेना नेते आदित्य ठाकरे यांनी रुग्णालयात भेट देत उपचार सुरू असेलेल्या मुलांची विचारपूस केली.



वरळीतील कोळीवाडा येथे पाच मुले दुपारी साडे तीन वाजण्याच्या सुमारास समुद्रात पोहण्यास गेली होती. ही पाचही मुले समुद्रात वाहून गेली. मुले वाहून जात असल्याची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी मुंबई अग्निशमन दल पोहोचण्याआधीच त्यांना समुद्रातून बाहेर काढले. स्थानिक नागरिकांनी या मुलांना खासगी वाहनांनी जवळच्या रुग्णालयात दाखल केले. मात्र यावेळी दोन मुलांचा दुर्दैवी मृत्यू झाला. तर वाहून गेलेल्या अन्य तीन मुलांवर केईएम रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या मुलीच्या प्रकृतीची माहिती उपलब्ध झालेली नाही.

10 वषार्चा मुलगा आणि 14 वर्षाच्या मुलीवर रुग्णालयात उपचार सुरु असून मुलाला आयसीयूमध्ये दाखल करण्यात आले आहे. ही सर्व मुलं वरळी परिसरातील असल्यामुळे स्थानिक आमदार म्हणून आदित्य ठाकरे यांनी या मुलांच्या कुटुंबियांना भेट देत जखमी मुलांच्या कुटुंबियाची विचारपूस केली.

## बँकेच्या ग्राहक सेवा केंद्राला दूरध्वनी करणे पडले महागात; महिलेच्या बँक खात्यातून साडेअकरा लाख रुपये गायब



मुंबईः बँक खात्यातील रक्कम हस्तांतरीत करण्यासाठी ग्राहक सेवा केंद्राला दूरध्वनी करणे ५८ वर्षांच्या महिलेला भलतेच महागात पडले. बँकेचा अधिकारी असल्याची बतावणी करून सायबर फसवणूक करणाऱ्या आरोपींनी महिलेच्या दोन बँक खात्यातून सुमारे साडेअकरा लाख रुपये काढल्याचा प्रकार घडला आहे. याप्रकरणी माहिती तंत्रज्ञान प्रतिबंधक कायदयांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पश्चिम प्रादेशिक विभागाचे सायबर पोलीस अधिक तपास करत आहेत. तक्रारदार महिला अंधेरीतील लोखंडवाला परिसरात तिच्या वयोवृद्ध पतीसह राहते. तिला एक मुलगा असून तो अमेरिकेत राहतो तर मुलगी डॉक्टर असून ती सध्या जमैका येथे राहते. ते दोघेही त्यांच्या मुलीकडे राहत असून दोन ते तीन वर्षांतून एकदा मुंबईत येतात. ११ नोव्हेंबरला तक्रारदार महिलेला तिच्या एका बँक खात्यातून दुसऱ्या खात्यात काही रक्कम हस्तांतरीत करायची होती, मात्र प्रक्रिया करुनही व्यवहार पूर्ण होत नव्हता. त्यामुळे तक्रारदार महिलने गुगलवरुन बँकेच्या ग्राहक सेवा केंद्राचा दूरध्वनी क्रमांक शोधण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी तिला एक मोबाईल क्रमांक सापडला. त्यावर संपर्क साधल्यानंतर संबंधित व्यक्तीने तो बँकेचा अधिकारी असल्याचे सांगून तिला एकर ॲप डाऊनलोड करण्यास सांगितले. तिने ते ॲप डाऊनलोड करुन तिच्या बँक खात्याची माहिती दिली. त्यावेळी तिच्या बँक खात्यातून दहा लाख पत्तीस हजार रुपये हस्तांतरीत झाले.

# अमेरिकेतील नोकरी वाचवायचीय?

## H1 B व्हिसाधारकांनी तात्काळ कराव्या 'या' गोष्टी

वाढती महागाई आणि महसूलात होणारी घट पाहता, अमेरिकेतील बड्या टेक कंपन्यांनी कर्मचारी कपातीचा धडाका सुरु केला आहे. कर्मचारी कपात ही सगळीकडे सारखीच दिसत असली तरीही एच १ बी व्हिसा धारक या कपातीमध्ये हीट लीस्टवर असतात. अनेक अमेरिकन कंपन्यांमधील एकूण कर्मचारी कपातीपैकी ५ ते १० टक्के कर्मचारी कपात ही एच १ बी व्हिसा धारकांची असते. या व्हिसा धारकांकडे अमेरिकेत नवीन नोकरीची संधी शोधण्यासाठी २ महिन्यांची मुदत असते. अन्यथा त्यांना देश सोडणे बंधनकारक आहे.

ग्लेन कंपनीचे संस्थापक अभियंता देबरघ्य दास यांच्या म्हणण्यानुसार, ज्या व्यक्ती १० वर्षांपेक्षा अधिक काळ अमेरिकेत घालवतात, त्यांना देश सोडण्याचे आदेश अमेरिकन सरकारने दिले आहेत.अशा लोकांना दास यांनी टाळेबंदीपासून वाचण्यासाठी खालील १० टिप्स दिल्या आहेत.




१. नव्या नोकरीसाठी मुलाखत तात्काळ द्या. छोट्या कंपन्यांना लेखी निवेदन द्या आणि तुमची व्हिसा संपत असल्याची टाईमलाईन स्पष्ट करा. २. तुमच्या नव्या कंपनीला एलसीए (७ ते १० दिवस) आणि एच वन बी व्हिसा दाखल करावे लागेल. याची संपूर्ण प्रक्रिया १५ दिवसांमध्ये पूर्ण करणे आवश्यक आहे. एल १२९ याचिका ६० दिवसांच्या आत दाखल करावी लागेल. ३. या दोन महिन्यांच्या कालावधीत नोकरी मिळालीच नाही तर तुम्हाला देश सोडावा लागेल. अशा परिस्थितीत घाबरुन जाऊ नका. अमेरिकेत नोकरी परत मिळणे कठीण नाही. तुमचा नवीन एच वन बी व्हिसा परत प्रोसेस करता येऊ शकतो. ४. 'असाधारण क्षमतेसाठी' ड-1 साठी अर्ज करण्याचा विचार करा. तुम्ही पात्र आहात की नाही हे एक चांगला वकील तुम्हाला सांगू शकतो. हे तुमच्या कामाच्या ठिकाणच्या व्यवस्थापनाशी जोडलेले नाही. यात प्रीमियम प्रक्रिया उपलब्ध आहे.

५. तुमच्या नोकरदात्याशी कमी पगार आणि अधिक कामासाठी वाटाघाटी करण्याचा प्रयत्न करा. सुट्टीचा काळ हा नोकरभरतीसाठी सर्वात वाईट कालावधी आहेत.

६ टाईमलाईन वाढवण्यासाठी तुमच्या जोडीदारावर अवलंबून राहण्याचा प्रयत्न करा.

७. एफ वनवर शाळेत जाण्यासाठी विचार करा. अशी परवानगी देणारी अनेक महाविद्यालये आहेत.

८. तुमच्या नोकरीच्या ठिकाणच्या व्यवस्थापनाने परवानगी दिली तर एच वन व्हिसाच्या स्टेटसमध्ये बदल करा.

## गर्भवती पत्नीच्या अपघाती मृत्यू; विरह सहन न झाल्याने पतीची आत्महत्या; पुण्यातील हृदयद्रावक घटना

**पुणे :** पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यात एक हृदयद्रावक घटना उघडकीस आली आहे. गर्भवती पत्नीचा अपघाती मृत्यू झाल्याने पतीनेही विष पिऊन आत्महत्या केली. ही घटना धोंडकरवाडी(ता. जुन्नर) येथे घडली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली आहे. नादुरुस्त रस्ता व अवजड वाहतूकीने एका सुखी संसराचा बळी घेतला आहे.



रमेश कानसकर (वय २९) असे आत्महत्या केलेल्या पतीचे नाव आहे. विद्या जाधव (वय २२) या त्याच्या गर्भवती पत्नीचा काही दिवसांपूर्वी मृत्यू झाला होता. रमेश कानसकर याचा ट्रॅक्टरच्या साह्याने शेट जमिनीचे सपाटीकारन करण्याच्या व्यवसाय होता. त्याचा काही महिन्यांपूर्वी विद्या हिच्याशी प्रेमविवाह झाला होता. दरम्यान, विद्या ही गर्भवती होती. दोघेही सोमवारी (दि १४) सासूसह दुचाकीवरून नारायणगाव येथे घरगुती समान खरेदी करण्यासाठी आले होते. खरेदी करून पुन्हा घरी जात असतांना सायंकाळी ६ च्या दरम्यान ते वारुळवाडी (ता.जुन्नर) येथे आले असताना एका भरधाव उस ट्रॅक्टर ट्रॉलीचा त्यांच्या दुचाकीला बसला बसला. यात त्याचा टोल गेल्याने विद्या ही खाली पडली.

यावेळी ट्रॉलीचे चाक विद्याच्या डोक्यावरून गेल्याने तिचा जागीच मृत्यू झाला. विद्याच्या अपघाती मृत्यूमुळे रमेश कानसकर तणावात होते. त्याने जेवण देखील सोडले होते. गुरुवारी पहाटे त्याने विषारी औषध घेतले. ही बाब घरच्यांना समजताच त्याला जुन्नर येथील खाजगी रुग्णालयात दाखल केले. मात्र, उपचारा दरम्यान त्याचा देखील मृत्यू झाला.

## भाविकांना दर्ग्याकडे घेऊन जाणा-या वाहनाला अपघात, 12 मुलांसह 20 जणांचा मृत्यू

पाकिस्तानातील पूरग्रस्त सिंध प्रांतात एक वाहन पाण्याने भरलेल्या खड्ड्यात कोसळून झालेल्या अपघातात १२ मुलांसह २० जणांचा मृत्यू झाला. महिला आणि लहान मुलांसह अनेक भाविक एका वाहनातून राज्यातील खैरपूर येथून सहवान शरीफकडे जात होते. दरम्यान, खैरपूरजवळील सिंधू महामार्गावर पुराच्या पाण्यासाठी बनवलेल्या खड्ड्यात प्रवासी व्हॅन कोसळली.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृतदेह बाहेर काढून सहवान शरीफ येथील सय्यद अब्दुल्ला शाह इन्स्टिट्यूटमध्ये पाठवण्यात आले आहेत. पोलीस अधिकारी इम्रान कुरेशी यांनी सांगितले की, वाहन खैरपूर जिल्ह्यातून प्रवाशांना सेहवान येथील प्रसिद्ध सुफी दर्ग्याकडे घेऊन जात होते. सिंधू नदीच्या पाण्याच्या प्रवाहाला गती देण्यासाठी सिंधू महामार्गाच्या पुढे ३० फूट रुंद खड्डा खोदण्यात आला होता. हा खड्डा सुमारे २ महिने पाण्याने भरलेला होता. तीन दशकांतील विक्रमी पावसामुळे देशातील सर्वात भीषण पुरामुळे पाकिस्तानला अभूतपूर्व त्रास सहन करावा लागला आहे. पुरामुळे १,६०० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला तसेच अनेक रस्ते आणि पुलांचे नुकसान झाले. घटनास्थळी उपस्थित असलेल्या लोकांनी सांगितले की, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या दुर्लक्षामुळे येथे खोदण्यात आलेला खड्डा २ महिन्यांपासून बुजवण्यात आला नाही, त्यामुळे हा अपघात झाला. माजी राष्ट्रपती आसिफ अली झरदारी यांनी अपघातावर शोक व्यक्त केला आहे. त्याचवेळी, पाकिस्तानच्या आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने म्हटले आहे की त्यांच्याकडे भीषण पुरामुळे विस्थापित झालेल्या लोकांची जिल्हावार आकडेवारी नाही.

## मुंबई-ठाण्याला जोडणारा कोपरी पूल बंद; गर्डर टाकण्याच्या कामाला सुरुवात

**ठणे :** ठाण्याला मुंबईशी जोडणा-या महामार्गावरील कोपरी पूल दुरुस्तीच्या कामासाठी उद्यापासून बंद ठेवण्यात येणार आहे. त्यामुळं ठाणे-मुंबई मार्गावर प्रवास करणा-या वाहनचालकांची मोठी गैरसोय होणार आहे. उद्या वाहतुकीसाठी पूल बंद केल्यानंतर गर्डर टाकण्याचं काम सुरू केलं जाणार आहे. ठाणे-मुंबई हा महामार्ग नेहमीच वर्दळीचा आणि गदीर्चा मानला जातो. परंतु आता उद्यापासून हा पूल बंद केला जाणार असल्यानं या महामार्गावरील वाहतूक दुस-या मार्गावरून वळवली जाणार आहे. उद्यापासून म्हणजेच १९ आणि २० नोव्हेंबरला रात्री ११ ते सकाळी ६ वाजेपर्यंत पूल बंद राहणार आहे. या वेळेत पुलावर गर्डर टाकण्याचं काम केलं जाणार आहे. यासाठी रस्त्याच्या दोन्ही बाजूला मोठ्या क्रेन लावण्यात येणार असल्यानं त्यामुळं त्याचा वाहतुकीवर परिणाम होणार असल्यानं मार्ग बंद ठेवण्यात येणार आहे. गेल्या काही महिन्यांपासून या मागाचं चौपदरीकरणाचंही काम सुरू आहे. परंतु पुलाच्या चौपदरीकरणाचं काम अजूनही अपूर्ण आहे.



ठाण्याहून मुंबईच्या दिशेने जाणा-या अवजड वाहनांना खारेगाव नाक्याजवळून ऐरोली-मुंबई ईस्ट एक्सप्रेस-वे-रेती बंदर-मुंब्रा बायपास-शिळेफाटा या मार्गावरून वळवण्यात येणार आहे.

## तारण म्हणून ठेवलेली गाडी मूळ मालकानेच चोरली, अंबरनाथ पोलिसांकडून चोरीचा बनाव उघड

**कर्ज म्हणून घेतलेले पैसे परत करावे लागू नयेत आणि आपली गाडी आपल्याला फुकटात परत मिळावी यासाठी मूळ मालकानेच गाडी चोरीचा बनाव केला. परंतु, अंबनाथ पोलिसांनी हा बनाव उघड केला.**

कर्ज घेताना तारण म्हणून ठेवलेली गाडी मूळ मालकानेच चोरून नेल्याचा प्रकार अंबरनाथमध्ये समोर आलाय. धक्कादायक बाब म्हणजे गाडी चोरल्यानंतर मूळ मालकाने स्वतः पोलिस ठाण्यात येऊन आपली गाडी चोरीला गेल्याची तक्रार दिली. मात्र पोलिसांनी त्याचा हा बनाव उघड करत मालकासह दोघांना बेड्या ठोकल्या आहेत. उल्हासनगरमध्ये राहणाऱ्या प्रकाश पंजाबी याच्या वडिलांना एप्रिल महिन्यात हार्ट अटॅक आल्यामुळे त्याला पैशांची तातडीने गरज होती. यावेळी त्याने त्याचा मित्र मुरली टेकचंदानी याच्याकडून दोन लाख रुपयांचे कर्ज घेतले होते. त्या मोबदल्यात त्याने त्याची ह्युडाई आय 10 ही गाडी मुरली टेकचंदानी



याच्याकडे तारण म्हणून ठेवली होती. ही गाडी मुरली टेकचंदानी याचा भाऊ बंटी टेकचंदानी हा वापरत होता. अंबरनाथ पूर्वेतील गोविंद पुलाजवळ ही गाडी तो उभा करून ठेवायचा. 29 सप्टेंबर 2022 रोजी रात्री ही गाडी बंटी याने नेहमीच्या ठिकाणी उभी करून ठेवली होती. मात्र दुसऱ्या दिवशी 30 सप्टेंबर रोजी त्याला ही गाडी तिथे दिसून आली नाही. त्यामुळे त्याने याबाबत मोठा भाऊ मुरली याला सांगितलं.

यावेळी मुरली यांनी जवळपासच्या परिसरात गाडी शोधली. शिवाय गाडीचा मूळ मालक प्रकाश पंजाबी याला देखील फोन करून तू गाडी घेऊन गेला आहेस का? अशी विचारणा केली. त्यावर प्रकाशने आपण गाडी नेलेली नसल्याचं सांगितलं. त्यामुळे मुरली टेकचंदानी आणि प्रकाश पंजाबी हे दोघेही शिवाजीनगर पोलिस ठाण्यात आले आणि त्यांनी गाडी चोरीला गेल्याची तक्रार केली. चोरीचा बनाव उघड तक्रार दाखल झाल्यानंतर पोलिसांपुढे ही गाडी शोधण्याचं आव्हान होतं. शिवाजीनगर पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक सुहास पाटील यांनी या गुन्ह्याचा तांत्रिक तपास सुरू केला.

यामध्ये ज्यावेळी ही गाडी चोरीला गेली त्यावेळी प्रकाश पंजाबी याचं मोबाईल लोकेशन गाडी उभी असलेल्याच भागात दाखवत असल्याचं निष्पन्न झालं. त्यामुळे प्रकाश पंजाबी याला ताब्यात घेत पोलिसांनी त्याची कसून चौकशी करताच त्याने आपणच आपली गाडी चोरून नेल्याची कबुली दिली. कर्जाची रक्कम परत करावी लागू नये चोरली कार कर्ज म्हणून घेतलेले पैसे परत करावे लागू नयेत आणि आपली गाडी आपल्याला फुकटात परत मिळावी, यासाठी त्याने सुरज विश्वकर्मा आणि तरुण पाटील या दोघांना गाडीची त्याच्याकडे असलेली चावी दिली आणि ती गाडी तिथून घेऊन येण्यास सांगितलं. त्यानंतर ही गाडी त्याने लपवून ठेवली होती. मात्र पोलिसांनी केलेल्या तपासात त्याने गाडी चोरल्याची कबुली दिल्यानंतर पोलिसांनी ही गाडी जप्त केली. या प्रकारामुळे मालकानेच स्वतःचीच गाडी चोरत बनाव रचल्याचा प्रकार शिवाजीनगर पोलिसांनी उघड केल्याची माहिती शिवाजीनगर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक लक्ष्मण कांबळे यांनी दिली आहे.

पोलीस बातमी पत्र

ALL SCAN & PAY ACCEPTED HERE

PhonePe G Pay Pay

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव (पूर्व), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत). संपर्कः-9594418181 / 8424989898